# खरेदीखत

## (शेत जमीनीचे)

| तपशील | सक्तीचे/ वैकल्पिक | रिक्त जागी भरावयाचा तपशील |
|---|---|---|
| खरेदीखत आज दिनांक (1) माहे (2) सन (3) रोजी-------- (4)------- या ठिकाणी लिहून दिले. | सक्तीचे | 1) दिनांक<br>2) माहे<br>3) सन<br>4) दस्त लिहिल्याचे ठिकाण |
| --------5)-------<br>वय ------(6)------वर्षे धंदा -----(7) ----------- राहणार------ (8)-----<br>पॅन नं------- (8अ) ------ आधार कार्ड नं -----( 8ब)----- इमेल आयडी -------(8क)------- मोबाईल नं -------(8ड)-------<br>लिहून घेणार<br>(ज्याचा उल्लेख लिहुन घेणार असा केलेला असुन त्यामध्ये त्याचे वालीवारस एक्झीक्युटर्स,ॲडमिनिस्ट्रेटर्स व असाइनीज यांचा समावेश आहे)<br>लिहून घेणार एकापेक्षा जास्त असल्यास प्रत्येकाची माहिती भरण्यात यावी. | सक्तीचे<br><br><br><br><br><br><br>वैकल्पिक | 5) विकत घेणा-याचे नाव<br>6) वय<br>7) धदा<br>8) पत्ता<br>8अ) पॅन नं (बाजारभाव किंमत रू. 5 लाखापेक्षा जास्त असल्यास सक्तीचे)<br>8ब) आधार कार्ड नं<br>8क) इमेल आयडी<br>8ड) मोबाईल नं |

| | | |
|---|---|---|
| --------(9)-------<br>वय ------(10)------वर्षे धंदा -----(11) ----------- राहणार------(12)-----पॅन नं------- (12अ) ------ आधार कार्ड नं -----(12ब)----- इमेल आयडी -------(12क)------- मोबाईल नं -------(12ड)---<br>लिहून देणार<br>(ज्याचा उल्लेख लिहुन घेणार असा केलेला असुन त्यामध्ये त्याचे वालीवारस एक्झीक्युटर्स,ॲडमिनिस्ट्रेटर्स व असाइनीज यांचा समावेश आहे)<br>लिहून देणार एकापेक्षा जास्त असल्यास प्रत्येकाची माहिती भरण्यात यावी. | सक्तीचे<br><br><br><br><br><br>वैकल्पिक | 9) नाव<br>10) वय<br>11) धदा<br>12) पत्ता<br>12अ) पॅन नं (बाजारभाव किंमत रू. 5 लाखापेक्षा जास्त असल्यास सक्तीचे)<br>12ब) आधार कार्ड नं<br>12क) इमेल आयडी<br>12ड) मोबाईल नं |

| | | |
|---|---|---|
| कारणे खरेदीखत लिहून देतो की, | | |
| (1)मिळकतीचे वर्णन:: तुकडी/ जिल्हा ---------(13)----- पोट तुकडी /तालुका ----------(14)------ तसेंच व ---(15)----- यांचे हद्दींतील गांव मौजे --------(18)------- येथील शेतजमीन गट /सर्व्हे नंबर ----(19)------ यांसी एकुण क्षेत्र ---(20)----हेक्टर-आर, याचा आकार------(21)---- रुपये - पैसे पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र हे आर यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे :-<br>पूर्वेस ::<br>दक्षिणेस :: .<br>पश्चिमेस ::<br>उत्तरेस<br>येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक मिळकत त्यांतील तसेंच जल, तरु, तृण, काष्ट, पाषाण, धोंडा, पाला पाचोळा, झाड झाडोरा, निधिनिक्षेप इत्यादि सर्व तदंगभुत वस्तुसहित तसेंच जाणे येण्याचे रस्त्याचे निरंतर वहिवाटीचे व वापराचे निरंतर हक्कासह, वहिवाटीचे, वागणुकीचे व ईजमेंटचे सर्व हक्कासह दरोबस्त. | | 13)जिल्हयाचे नाव<br>14) तालुक्याचे नाव<br>15) शेत जमिन नगरपालिका किंवा महानगरपालिका हद्दीबाहेरील असल्यास जिल्हा परिषद तालुका पंचायत समिती पैकी<br>16) महानगर पालिका /नगरपालीका /ग्रामपंचायत<br>17) मौजे<br>18)) सर्व्हे नं / गट<br>19) मजला<br>20) दुकान / सदनिका क्र.<br>21)क्षेत्रफळ ------- |

| | | |
|---|---|---|
| (2) वर कलम नंबर 1 यांत वर्णन केलेली मिळकत लिहुन देणार याचे वाडिलोपार्जीत मालकी हक्काची असुन त्यांचे नावाची नोंद सरकार कागदोपत्री व सातबारा सदरी लिहुन देणार यांचे नावे मालक कब्जेदार म्हणुन दाखल आहे आहे त्यावर लिहुन देणार यांचे व्यतिरिक्त इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा मालकी हक्क वा आधिकार नाही . त्यामुळे सदरची मिळकतीचा उपभोग घेण्याचा व विल्हेवाट लावण्याचा हस्तांतर करण्याचा लिहुन देणार यांना एकमेव हक्क व आधिकार आहे.<br><br>किंवा<br><br>वर कलम नंबर 1 यांत वर्णन केलेली मिळकत लिहुन देणार खरेदी मालकीची असुन सदर मिळकत त्यांनी .. .. . . यांचेकडुन कायम खुषखरेदी घेतली असुन सदर दस्त दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात अनुक्रम नंबर . . . ने दिनांक . . . . रोजी नोंदला असुन त्यांचे नावाची नोंद फेरफार क्रमांक ... ने सरकार कागदोपत्री व सातबारा सदरी लिहुन देणार यांचे नावे मालक कब्जेदार म्हणुन दाखल आहे. त्यावर लिहुन देणार यांचे व्यतिरिक्त इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा मालकी हक्क वा आधिकार नाही . त्यामुळे सदरची मिळकतीचा उपभोग घेण्याचा व विल्हेवाट लावण्याचा | | |

| | | |
|---|---|---|
| हस्तांतर करण्याचा लिहुन देणार यांना एकमेव हक्क व आधिकार आहे. | | |
| (3) लिहुन देणार यांना त्यांचे काही वैयक्तीक व कायदेशीर कौटुंबिक अडचणींचे निवारण करण्यासाठी तसेच कुटुंबातील अज्ञानांचे पालन पोषण शिक्षण त्यांचे हितासाठी व सज्ञान घटकांसाठी वर कलम 1 यात वर्णन केलेली मिळकत विक्रीस काढली व लिहुन घेणार यांना त्याची माहिती झाल्यावरुन लिहुन घेणार यांनी सदर मिळकत रक्कम रु . . . . .(अक्षरी रक्कम रुपये . . . . ) या उक्त्या किंमतीस कायम खुष खरेदीने विकत घेण्याची तयारी दर्शवली व ही किंमत लिहुन देणार यांना आजतागायत आलेल्या किंमतीपेक्षा सर्वाधिक वरचढ असल्याने लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांचेकडुन सदर रकमेचा भरणा भरण्याचे तपशीलात नमुद केल्याप्रमाणे स्विकार करुन सदर मिळकतीचा खरेदीखताचा दस्त लिहुन व नोंदवुन देउन दिलेला आहे | | |
| .<br>(4) लिहुन देणार असे नमुद करतात की वर कलम नंबर 1 | | |

| | | |
|---|---|---|
| यांत वर्णन केलेली मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजारहित असून सदरील मिळकत कोणत्याही कोर्टांत दाव्याचा विषय म्हणून दाखल नाही अथवा जप्त किंवा ॲटॅच झालेली नाही . ती एक्वायर झालेली नसून सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा गहाण दान लिन लीज पोटगी अन्न वस्त्र बक्षीस अदलाबदल मृत्युपत्र वारसाहक्क, वाटप कोर्ट वाद अतिक्रमण खरेदीखत ताबा साठे करार कुलमुखत्यारपत्र अगर तत्सम स्वरुपाचा बोजा नव्हता व नाही. त्याचप्रमाणे सदरची मिळकत कोठेही ॲक्वायर, रिक्वायर अगर रिझर्व्ह होणेबाबत आम्हांस नोटीस आलेली नाही . व सदर मिळकतीला मार्केटेबल टायटल असुन लिहुन देणार यांचे मालकी हक्काबाबत व मार्केटेबल टायटल बाबत लिहुन घेणार यांनी खात्री करुन घेतलेली आहे. अशा निर्वेध मिळकतीची मोजणी करुन हद्दी व क्षेत्र नक्की करुन सदर खरेदीखताचा दस्त लिहुन देणार यांनी लिहुद देउन प्रत्यक्ष लिहुन घेणार यांचे ताब्यात मालकी हक्काने दिली आहे. ती परत घेण्याबाबत कोणताही लेखी वा तोंडी करार केलेला नाही. | | |
| (5) आता हया खरेदीखताने लिहुन घेणार सदर मिळकतीचे पुर्णपणे मालक झाला आहात. तरी खरेदीदार मालक म्हणुन तुम्ही तुमचे पुत्र पौत्रादी,वंशपरंपरा, निरंतरपणे मालकी हक्काने वाहिवाट करावी उपभोग घ्यावा अथवा विल्हेवाट लावावी. तुमचे मालकी हक्कांस, वाहिवाटीस व उपभोगास आम्ही किंवा आमचे भाऊ, भाऊबंद, वालीवारस, सावसावकार इ. कोणीही हिल्ला हरकत | | |

| | | |
|---|---|---|
| करणार नाही व तसे कोणी केल्यास त्याचे निवारण करण्याची सर्वस्वी जबाबदारी आमचेवर राहील. त्याची कोणतीही तोषीस तुम्हांस लागु देणार नाही. | | |
| (6) सदर मिळकतीचे आजपर्यंतचे सर्व प्रकारचे सरकारी व निमसरकारी स्थानीक संस्था यांचे कर पट्टया पासोडया लिहुन देणार यांनी भरलेले आहेत. आता यापुढील येणारे सर्व प्रकारचे सरकारी व निमसरकारी कर मालकी हक्काने लिहुन घेणार यांनी भरावेत. मागील कोणत्याही कराची थकबाकी असल्यास ती लिहुन देणार भरतील त्याची कोणतीही तोषीस लिहुन घेणार यांना लागु देणार नाही. | | |
| (7) सदर मिळकतीचे 7/12 सदरी व इतर महसुल दप्तरी लिहुन घेणार यांनी आपले नावाची मालक म्हणुन नोंद करुन घ्यावी. त्याकामी लिहुन देणार यांची सही संमती लागल्यास समक्ष हजर राहुन अर्ज , जाब जबाब, सही संमती विनामोबदला देवुन लिहुन घेणार यांचे नावावर करुन देतील . त्याकामी तक्रार वा हरकत करणार नाही. | | |

| | | |
|---|---|---|
| 8). वर कलम 1 यात वर्णन केलेल्या मिळकतीचे टायटलमध्ये कालांतराने काही दोष आढळुन आल्यास व त्यामुळे लिहुन घेणार यांचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई हे लिहुन देणार करुन देतील त्याची तोषीस लिहुन घेणार यांना लागु देणार नाहीत<br>.<br><br>9) वर कलम 1 यात वर्णन केलेली मिळकत लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना सदर दस्ताने खरेदी दिली असुन ती परत बोलीची नाही. सदरचा खरेदीखताचा दस्त लिहुन देणार व त्यांचे वाली वारसांवर बंधनकारक संपुर्णत: बंधनकारक आहे. या इपर लिहुन घेणार यांचे मालकी हक्कास व ताबे वहीवाटीस लिहुन देणार यांचे वालीवारस सावसावकार यांनी कोणत्याही प्रकारची हिल्ला हरकत केल्यास त्याचे निवारण लिहुन देणार हे स्वखर्चाने करुन देतील त्याची तोषीस लिहुन घेणार यांना लागु देणार नाहीत. | | |
| 10) भरण्याचा तपाशिल -<br>रु . . . या खरेदीखतावर ने मिळाले<br>. . . . . . . . . . . .. . . .. .. . . | | |

| | | |
|---|---|---|
| रु एकुण<br><br>वरीलप्रमाणे सदरच्या मिळकतीच्या मोबदल्यापोटी संपुर्ण रक्कम रु. /- (रुपये ) फक्त मिळाली त्याची वेगळी पावती देण्याची गरज नाही. रकमेबाबत कोणताही वाद राहीला नाही | | |

| | | |
|---|---|---|
| 11) कोणत्याही कारणास्तव सदर मिळकतीच्या मोजमापामध्ये अथवा वर्णनामध्ये अथवा चतु:सिमामध्ये बदल झाला तरीदेखी सदरचे खरेदीखत आमचेवर बंधनकारक राहणार आहे. तसेच भाविष्यात आम्हाला वर नमूद केलेल्या मोबदल्याव्यातिरिक्त जादा मोबदला मागण्याचा हक्क व आधिकार राहणार नाही व सदर मिळकतीच्या चतु:सीमा या लिहुन देणार यांनी दिलेल्या माहितीवरुन व गावचे गट नकाशावरुन नमुद केल्या आहेत. परंतु त्यात काही चुक / चुका आढळुन आल्यास मुलकी दप्तरी व गावच्या नकाशात दर्शवल्याप्रमाणे ज्या चतु:सीमा असतील त्या अंतिम चतु:सीमा धरण्यात येतील . | | |

| | | |
|---|---|---|
| | | |
| 12)यदाकदाचित सदर खरेदीखतामध्ये काही चुक झाल्याचे आढळल्यास त्याचा दुरुस्ती लेख / चुक दुरुस्ती पत्राचा दस्त लिहुन देणार हे लिहुन घेणार यांना विना विलंब विनामोबदला विनातक्रार लिहुन व नोंदवुन देतील . | | |

| | | |
|---|---|---|
| 13) वर कलम नं 1 यांत वर्णन केलेली मिळकत ही मुद्रांक मुख्य नियंत्रक व महसुल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक यांनी प्रसिध्द केलेल्या वार्षीक बाजारमुल्य तक्त्यात विभाग क्र . मध्ये मोडत असुन त्याप्रमाणे सदर मिळकतीची किंमत रु . . . . . इतकी येत आहे परंतु प्रस्तुत खरेदीखताची किंमत वरील किमतीपेक्षा जास्त येत असल्याने सदर जादा किमतीवर मुद्रांक शुल्क व नोंदणी फी भरली आहे. | | |

| | | |
|---|---|---|
| 14) सदर खरेदीखताचा संपुर्ण खर्च उदा. मुद्रांक, नोंदणी फी | | |

| | | |
|---|---|---|
| , टायपींग इत्यादी खर्च हा लिहुन घेणार यांनी केलेला आहे. | | |
| सदर कायमखुश खरेदीखत लिहुन देणार व त्यांचे वालीवारसांवर तसेच लिहुन घेणार व त्यांचे वालीवारसांवर बंधनकारक राहणार असून ते उभयतांना मान्य व कबुल आहे.<br><br>सदर कायमखुश खरेदीखत हे आम्ही आमचे राजिखुषीने, अक्कल हूशारीने, स्वसंतोषाने, समजून उमजून वाचून घेवुन लिहून व नोंदवून दिले असे. ता.म. | | |
| सही<br>नाव<br>लिहुन घेणार | | |
| सही<br>नाव<br>लिहुन देणार | | |
| साक्षीदार<br>सही<br>नाव<br>पत्ता | | |
| साक्षीदार<br>सही | | |

| | | |
|---|---|---|
| नाव<br>पत्ता | | |